N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** वानवडी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0131 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 07/04/2026 12:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिंनाक पासून):** 06/04/2026

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 06/04/2026

**Time From (वेळेपासून):** 16:59 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:59 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 07/04/2026 **Time (वेळ):** 12:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 017

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 07/04/2026 12:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** 93 अँव्हेन्यु मल समोर, ,डीएसआर, बिल्डींग फिडीलिटी डायग्नोस्टीक,च्या समोर बि टी कवडे रोड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.प्रविण नारायण निंबाळकर पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख़/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,वानवडी,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,वानवडी,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9552574140

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल पोपट रंधवे | | | 1. कनिष्ठ सहायक,शिक्षण,विभाग, जिल्हा परीषद पुणे ,वानवडी,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | आतिष केरु शिंदे | | | 1. कनिष्ठ सहायक ,शिक्षण विभाग, जिल्हा परीषद,पुणे,वानवडी,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | राजेश श्रीराम खंदारे | | | 1. सहायक प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग ,जिल्हा परीषद पुण,वानवडी,पुणे शहर,महाराष्ट्र, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद तारीख 07/04/2026

मी प्रविण नारायण निंबाळकर,वय-39 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे मो.नं.9552574140.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 06.01.2026 रोजी मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग ,पुणे येथे हजर असताना प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी तक्रारदार श्री.पवन मारोती वाघाडे यांची लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे सांगुन त्यासाठी पथक तसेच महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी ,मर्या ,रास्ता पेठ पुणे येथील 1) श्री. धनंजय एकनाथ मुठे, निम्नस्तर लिपीक, 2) श्री. अक्षय प्रभाकर गोळपकर कनिष्ठ सहायक (लेखा) म.रा.वि.वि कंपनी मर्यादीत रास्ता पेठ उप विभाग पुणे हे पंच उपलब्ध करुन दिले. सदर पंचासमक्ष तक्रारदार यांनी तक्रार प्रथम तोंडी कथन करुन टंकलिखत तक्रार दिली.

"श्री.पवन मारोती वाघाडे ,वय-36 वर्षे व्यवसाय नोकरी पद उप शिक्षण सेवक रा.नंदकिशोर राजवाडे यांचे निवासस्थान ता.वेल्हे जि.पुणे मो.नं.9021638592.असे असुन त्यांनी सन 2017 साली पवित्र पोर्टल द्वारे शिक्षक पदाची परीक्षा दिली होती.आणि त्या आधारावर त्यांची निवड दि.07/09/2019 रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे यांच्या आदेशान्वये शिक्षण सेवक म्हणुन ST pesa (Not Applicable) प्रवर्गातुन झाली आहे. त्यानुसार ते जिल्हा परीषद प्राथमिक शाळा बालवड ता.वेल्हे जि.पुणे येथे शिक्षण सेवक पदावर रुजु झाले असुन नमुद शाळेवर तेव्हापासुन शिक्षण सेवक म्हणुन काम करत आहे.

सन 2019 ते सन 2022 पर्यंत त्यांचा शिक्षण सेवक पदाचा तीन वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला आहे.दि. 12/09/2022 पासुन उपशिक्षक या पदाची वेतनश्रेणी घेण्याकरीता पात्र आहेत त्यांनी सन 2022 साली मा. शिक्षणाधिकारी वेल्हे यांना त्यांना शिक्षण सेवक ते उप शिक्षक या पदावर कायम करण्यासंदर्भात अर्ज सादर केला होता.सदर प्रस्तावाबाबत त्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्या कारणामुळे सदरचा प्रस्ताव मार्गदर्शनासाठी मंत्रालयाकडे पाठविला होता त्यावर मंत्रालयाचे मार्गदर्शन मिळाल्यानतर सदर प्रस्तावाचा पाठपुरावा करण्यासाठी सदर टेबलचे गायकवाड यांना वेळोवेळी भेटले असता त्यांनी सदरचे काम केले नाही.त्यानंतर तक्रारदार हे दि. 21/11/2025 रोजी अधिक्षक खंदारे साहेब यांना त्यांच्या कामासंदर्भात भेटले असता त्यांनी तक्रारदार यांची माहिती विचारुन लिहुन घेतली व त्यांना शिक्षण सेवक पदावरुन उप शिक्षक पदावर घेताना जरी जात वैधता प्रमाणपत्र नसले तरी अधिंसख्य पदावर वर्ग करुन घेता येईल व इतर सेवाविषयक लाभ देता येतील अशी शिफारस करुन प्रस्ताव वर पाठवणेकरीता श्री.खंदारे साहेब यांनी स्वत:साठी तसेच वरीष्ठांना दयायचे असे सांगुन 3,00,000/- लाख रुपये दयावे लागतील असे सांगुन अधिंसख्य पदाचा प्रस्ताव क्लार्क रणदीवे सांगतिल त्या नमुन्याप्रमाणे तयार करुन सादर करा असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार हे क्लार्क रणदीवे यांना भेटले त्यावेळी

तक्रारदार यांनी क्लार्क रणदीवे यांनी सांगितलेल्या नमुन्याप्रमाणे तयार केलेला प्रस्ताव दि.03/12/2025 रोजी मा. गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती वेल्हे यांना सादर केला .त्यांच्या सदर प्रस्तावावरुन गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती वेल्हे यांनी शिक्षणाधिकारी प्राथमिक पुणे जिल्हा परीषद पुणे यांना 26/12/2025 रोजी देण्यासाठी प्रस्ताव तयार केला.सदरचा प्रस्ताय तक्रारदार यांनी स्यहस्ते दि.29/12/2025 रोजी टपाल कक्ष जिल्हा परीषद पुणे येथे जमा केला.

तरी तक्रारदार यांना शिक्षण सेवक पदावरुन उप शिक्षक पदावर घेताना जातवैधता प्रमाणपत्र नसले तरी अधिंसख्य पदावर वर्ग करुन घेतो व इतर सेवाविषयक व सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळवुन देता येतील अशी शिफारस करुन प्रस्ताव वर पाठवतो त्याकरीता अधिक्षक खंदारे यांनी स्वत:साठी तसेच वरीष्ठांना दयायचे आहेत असे सांगुन 3,00,000/- रु ची मागणी केली असुन त्यांनी मागितलेले तीन लाख रुपये ही लाच रक्कम असुन ती देण्याची त्यांची इच्छा नसलेने लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे यांचेकडे तक्रार दिली अशा आशयाच्या तक्रारीवर आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारले असता त्यांनी अधिक्षक खंदारे हे इलेक्शन मध्ये व्यस्त असल्याने पुढील कारवाई मी संपर्क करेन त्यावेळी करु असे सांगितले. दि.22/01/2026 रोजी तक्रारदार वाघाडे यांनी पुढील कारवाई करणेबाबत संपर्क केलेने त्यानंतर तक्रारदार श्री.वाघाडे यांना अधिक्षक खंदारे जिल्हा परीषद पुणे यांचेकडे लाच मागणी पडताळणी करीता सोनी कंपनीच्या काळया रंगाच्या शासकिय व्हॉईस रेकॉडर मध्ये सॅनडिस्क कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे सिंलबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड त्याचे एका बाजुस एका बाजुस Sandisk Ultra 16GB A1 Micro SD HC I C4 व 2374DRED7131 BL MADE IN CHINA टाकुन तक्रारदार श्री.पवन वाघाडे यांचे निवेदन घेऊन त्यापाठोपाठ पंच क्र. 1 व 2 यांचे निवेदन घेतली ती वेळ 11.15 वा.ची होती.सदर निवेदन घेतेवेळी नवीन लेक्सर कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे सिंलबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड त्याचे एका बाजुस. Lexar Micro SD HC I V10 1U A1 633X 32GB व त्याचे दुस-या बाजुस FC CE VCI L1129250032A2A82W2445111164M मध्ये पंचासमक्ष व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे.

त्यानंतर पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार ,दोन्ही पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार श्री.वाघाडे यांना लावुन दिला व पंच क्र.01 श्री.मुठे यांचेसह पडताळणीकामी दुचाकी वरुन अधिक्षक खंदारे,जिल्हा परीषद पुणे यांचे कार्यालय येथे लाचलुचपत प्रतिंबधक विभाग ,पुणे येथुन रवाना केले ती वेळ 11.29 वा ची होती.

त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 14.54 वा ची होती. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, “मी व पंच क्र.1 श्री.मुठे असे येथे गेलो सदर ठिकाणी अधिक्षक खंदारे व क्लार्क रणदिवे यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांचेत व माझेत पंचासमक्ष माझे कामासंदर्भात चर्चा झाली सदर चर्चे वेळी अधिक्षक खंदारे यांनी माझेकडे लाच मागणी केली नाही. त्यानंतर तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी पुढील कारवाई मी आपणास संपर्क करेल त्यावेळी करण्यात यावी असे सांगितले त्यादिवशीची कारवाई स्थगित केली.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

त्यानंतर दि.11/02/2026 रोजी तक्रारदार यांनी पुढील कारवाई करणेबाबत सपर्क केलेने तक्रारदार श्री.वाघाडे यांना अधिक्षक खंदारे जिल्हा परीषद पुणे यांचेकडे लाच मागणी पडताळणी करीता पाठविण्याचे ठरलेने शासकिय व्हॉईस रेकॉर्डरवर तक्रारदार यांचे व त्यापाठोपाठ पंच क्र.1 व 2 यांचे निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 11.33 वा. ची होती. सदर निवेदन घेतेवेळी पंचासमक्ष व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे.

त्यानंतर पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार ,दोन्ही पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार श्री.वाघाडे यांना लावुन दिला व पंच क्र.01 श्री.मुठे यांचेसह दुचाकी वरुन पडताळणीकामी अधिक्षक खंदारे यांचेकडे जिल्हा परीषद पुणे येथे रवाना केले ती वेळ 12.14 वा ची होती.

त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले ती वेळ 13.10 वा ची होती. सदर वेळी व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन आम्ही तक्रारदार यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व पंच क्र.01 मुठे जिल्हा परीषद,पुणे येथे जाऊन अधिक्षक खंदारे यांची भेट घेतली त्यावेळी मी त्यांना “झाली का सही, ऑर्डर बघायला मिळल का सर?” अशी विचारणा करता त्यांनी अनिल रणदीवे यांचेकडे ऑर्डर बघण्यासाठी जाणेस सांगितले त्यानुसार मी क्लार्क अनिल रणदीवे यांचेकडे जाऊन ऑर्डर बघायचीय असे बोललो असता क्लार्क रणदीवे यांनी मला “फाईल गेली वर, उदया फायनल सही होईल असे म्हणाले. “आज होईल का सही? अशी विचारले असता “हा ... आज म्हटल तर आज होईल उदया म्हटल तर उदया” असे म्हणाले.

त्यानंतर मी अधिक्षक खंदारे यांची पंच मुठे यांचे समक्ष भेट घेऊन "बदलीतली सर ऑर्डर ... "हा केलय व्यवस्थित केलय" असे म्हणालो.त्यावेळी मी खंदारे साहेबांना "साहेब कसं करायचे मग"? असे विचारले असता त्यांनी मला क्लार्क रणदीवे यांना भेटण्यास सांगितले त्यानंतर मी रणदीवे क्लार्क यांचेकडे पंचासह जाऊन भेटुन "सर तुम्हाला भेटायला सांगितल ...किती करायचे? असे विचारले त्यावर रणदीवे क्लार्क "सगळच करा" असे म्हणाले त्यावर मी "एवढे नाय आणले" असे म्हणालो असता "किती आणलेत"? असे विचारले त्यावर मी "अजुन एक विचारायच होत" असे म्हणाले असता "खाली ये" असे म्हणुन मला कार्यालयाच्या खाली जाणेस सांगुन क्लार्क रणदीवे हे आमचे पाठोपाठ कार्यालयाच्या खाली आले. त्यावेळी क्लार्क रणदीवे यांनी पंचाबाबत विचारणा केली त्यावर मी भाऊ असल्याचे सांगितले.त्यानंतर मी "अमाऊंट किती दयायची? असे बोलले असता "तिन सांगितलेली होती ना" असे रणदीवे म्हणाले . त्यानंतर क्लार्क रणदीवे व माझे मध्ये माझे प्रलंबित कामा संदर्भात चर्चा झाली त्यानंतर मी क्लार्क रणदीवे यांना "चालतय मग ...काढतो मग एटीएम मधुन. असे म्हणाले त्यावर "इथ पुढ आहे." असे म्हणाले त्यानंतर मी व पंच आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो.

वरीष्ठांकडे पडताळणी करणे आवश्यक असलेने तक्रारदार यांना अधिक्षक खंदारे व वरीष्ठ यांचेकडे पडताळणीकामी व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार श्री.वाघाडे यांना लावुन पंच क्र.01 श्री.मुठे यांचेसह पडताळणीकामी दुचाकी वरुन लाचलुचपत प्रतिंबधक कार्यालय पुणे येथुन, लोकसेवक यांचे कार्यालय जिल्हा परीषद पुणे येथे रवाना केले ती वेळ 15.39 वा ची होती.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 16.41 वा.ची होती त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की,मी व पंच मुठे असे जिल्हा परीषद पुणे येथे जाऊन खंदारे साहेबांची भेट घेऊन रणदीवे सरांसोबत बोलणे झाले असे सांगुन त्यांनी तीन लाख रुपये सांगितले असे बोललो असता त्यांनी "हं" असे म्हणुन होकार दिला त्यानंतर ते, मागच्या वेळेस झालत ना तुमच बोलण?" असे म्हणले व मग, त्यांना किती केल आत्ता?" असे खंदारे यांनी विचारले असता, "मी नाय आत्ता केलच नाय त्यांना ते पुर्णच करा म्हणत होते" असे सांगुन ,"त्या दिवशी पंचवीस हजार दिले त्यांना" असे म्हणालो असता "पंचवीस दिले माहितीय मला" असे खंदारे म्हणाले.त्यानंतर मी "तीन लाखच करायच ना?"असे खंदारे साहेबांना विचारले असता त्यांनी "हो हो ते विचारा की त्या दुसरे तुमच्या दोघांना पण"असे म्हणाले त्यानंतर मी "पंचवीस हजार दिले आता किती दयावे लागतील सही घेण्यासाठी?"असे विचारले असता त्यांनी, "एक दिड तरी दयाना त्याला" असे म्हणाले. त्यानंतर मी "साहेब आता दोन लाख पंच्याहत्तर दयाव लागल?" असे विचारले असता खंदारे साहेब "हं" असे म्हणाले त्यावर मी आता किती करावे लागतील असे विचारले असता त्यांनी "आता कमीत कमी एक तरी करा ना त्याला" असे म्हणाले त्यावर मी "01 लाख रुपये?" असे विचारले असता "हां म्हणजे वर देऊन येईल तो लगेच" असे म्हणाले त्यावर मी "आता मी पंचवीस हजार रुपय मी त्या दिवशी त्यांना दिले सर आता दोन पंच्याहत्तर बाकिय" असे म्हणाले असता त्यावर "एक देऊन टाक त्यांना" असे खंदारे साहेब म्हणाले. त्यानंतर मी रणदीवे क्लार्क यांची भेट घेतली "त्यांना मी म्हटल सर तीन लाख रुपये काय अँडजस्ट होणार नाय सर" असे खंदारे यांना म्हणालो असता त्यांनी कमी जास्त तर नाय होणार म्हणजे यातुन लागल तर एक दिड लाख रुपये करा अजुन असे म्हणाले तस रणदीवे सरांना भेटून घ्या म्हणे तुम्ही मी सांगतो. असे खंदारे सर म्हणालेचे रणदीवे यांना सांगितले असता त्यावर रणदीवे यांनी ,नाय नाय ती फाईल थांबेल तशी" असे म्हणाले.त्यानंतर मी "पण सर तीन लाख पुर्णच अँडजस्ट कराव लागतील का?"असे विचारले असता त्यांनी "हो त्याला काहीच पर्याय नाय" असे सांगितले.त्यानंतर मी त्यांना "तुम्हाला कुठुन तरी पंचवीस हजार तुम्हाला आणुन दिलेय" त्यावर ते "हो" असे म्हणाले.त्यावर मी त्यांना "म्हंजे दोन लाख पंच्याहत्तर तुम्हाला दयावच लागल असे विचारले असता "हां तुम्ही कुठुन बी कसबी अँडजस्ट करा तुमच. त्यानंतर मी "तीन लाखातुन पंचवीस हजार आपण दिलेत मग दोन लाख पंच्याहत्तर च दयावे लागल न"? असे विचारले असता रणदीवे "हा" असे म्हणले. त्यानंतर माझ्या कामाच्या अनुषंगाने चर्चा होऊन सदरचे पैसे दिले तर काम होईल नाहीतर फाईल थांबेल असे बोलले.

सदर पडतळणी वेळी तक्रारदार यांना शिक्षण सेवक पदावरुन उप शिक्षक पदावर घेताना जातवैधता प्रमाणपत्र नसले तरी अधिंसख्य पदावर वर्ग करुन घेतो व इतर सेवाविषयक व सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळवुन देता येतील अशी शिफारस करुन प्रस्ताव वर पाठवतो त्याकरीता अधिक्षक खंदारे व क्लार्क रणदीवे यांनी स्वत:साठी तसेच वरीष्ठांना दयायचे आहेत असे सांगुन तक्रारदार यांचेकडे 3,00,000/- रु ची मागणी करुन त्यातील 25,000/- रुपये यापुर्वी स्विकारल्याचे मान्य करुन उर्वरीत 2,75,000/- रुपयाची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तक्रारदार यांना पुढील पडताळणीकामी विचारणा केली असता त्यांनी कौटुंबिक कारणामुळे पुढील कारवाई नंतर करणेबाबत विंनती केलेने त्या दिवशीची कारवाई स्थगित करण्यात आली. सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आलेला आहे.

त्यानंतर दि.17/02/2026 रोजी तक्रारदार श्री.वाघाडे यांनी पुढील कारवाई करणेबाबत संपर्क केलेने तक्रारदार श्री.वाघाडे यांना अधिक्षक खंदारे यांचे वरीष्ठ श्री.नाइकडे व इतर वरीष्ठ यांचेकडे पडताळणीकामी पाठविण्याकरीता तक्रारदार श्री.वाघाडे, व दोन्ही पंचांचे निवेदने व्ही एम इलाईट कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे सिलबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड त्याचे एका बाजुस VM Elite 32 GB C10 1U Y10 Micro SD HC I व दुस-या बाजुस EETF32GMRO825 0032F5A55 W2517044242M मध्ये ध्वनिमुद्रीत केली ती वेळ 12.02 वा. ची होती सदर वेळी व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात आले.त्यानंतर सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार श्री.वाघाडे यांना लावुन दिला व पंच क्र.01 श्री.मुठे यांचेसह दुचाकी वरुन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय पुणे येथुन, लोकसेवक यांचे कार्यालय जिल्हा परीषद पुणे येथे 12.24 वा रवाना केले.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले सदर वेळी व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 13.00 वा.ची होती. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की नाइकडे साहेब मिटींगला गेलेने त्यांची भेट झाली नाही.

त्यानंतर थोडया वेळाने नाइकडे हे कार्यालयात आले असतील त्यामुळे पुन्हा व्हॉइस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्री.वाघाडे यांना लावुन देऊन पंच क्र.01 श्री.मुठे यांचेसह पडताळणीकामी दुचाकी वरुन लाचलुचपत प्रतिंबधक कार्यालय पुणे येथुन, लोकसेवक यांचे कार्यालय जिल्हा परीषद पुणे येथे रवाना केले ती वेळ 15.04 वा ची होती. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.01 हे 18.05 वाजता परत आले त्यावेळी त्यांचेकडील व्हॉईस रेकॉडर बंद केला त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, मी व पंच मुठे असे जिल्हा परीषद पुणे येथे गेलो त्यावेळीही नाईकडे साहेबांची मिटींग चालु होती त्यामुळे नाईकडे साहेबांची भेट झाली नाही.त्यानंतर तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की आज रोजी वरीष्ठांची भेट होणे शक्य नाही पुढील कारवाई मी आपणास संपर्क करेन त्यावेळी करु असे सांगितलेने त्या दिवशीची कारवाई स्थगित केली.सदरबाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

त्यानंतर दि.23/02/2026 रोजी तक्रारदार श्री.वाघाडे यांनी पुढील करणेबाबत संपर्क केलेने तक्रारदार श्री. वाघाडे, व दोन्ही पंचांचे निवेदने ध्वनिमुद्रीत केली ती वेळ 11.41 वा. ची होती सदर वेळी व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात आले.त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार श्री.वाघाडे यांना लावुन देऊन पंच क्र.01 श्री.मुठे यांचेसह दुचाकी वरुन जिल्हा परीषद पुणे येथे 12.06 वा रवाना केले.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 16.48 वा.ची होती. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की,रणदीवे क्लार्क भेटले त्यावेळी त्यांनी मला ऑफलाईनची फाईल घेऊन आलो असे सांगितले त्यावेळी मी क्लार्क रणदीवे यांना भेटु साहेबांना ?असे म्हणालो त्यावर रणदीवे यांनी हं असे बोलले व निघुन गेले.त्यानंतर मी खंदारे साहेबांच्या केबीनमध्ये जाऊन त्यांना "नाइकडे साहेबांची भेट करुन दिली असती तुम्ही." असे बोललो त्यावर त्यांनी मला "कशासाठी" असे विचारले व वरीष्ठांची भेट घेऊन देण्यास नकार दिला. त्यानंतर मी नाइकडे साहेबांची भेट घेण्यासाठी तेथेच थांबुन राहीलो थोडया वेळाने मला खंदारे साहेब दिसले त्यावेळी मी खंदारे साहेबांना "साहेब भेटु का जाऊन मी ...साहेबांना भेटायच होत" आपण आलात सोबत तरी ... भ्ेट होईल त्यांच्या सोबत बोलण करुन",असे विचारले त्यावर खंदारे साहेब "काय होत माहितीय का,"साहेब काय म्हणतील आर वरुन सही तर होऊन येऊ दे सी ओ साहेबांची मग भेटव ना मला" अस होइल" "तिकड बस" असे म्हणुन खंदारे साहेब निघुन गेले व माझी भेट होऊ दिली नाही. त्यानंतर मी व पंच आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो.

त्यानंतर खंदारे यांचे वरीष्ठ नाईकडे यांची भेट घेऊन पडताळणी करणे आवश्यक असलेने पुन्हा तक्रारदार यांना वरीष्ठांची भेट घेणेकामी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन पंच मुठे यांचेसह खंदारे यांचे वरीष्ठ यांचेकडे पडताळणीकामी 17.46 वा रवाना केले त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 19.06 वा. ची होती. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की,मी पंच मुठे यांचे सह जिल्हा परीषद पुणे येथे गेलो व नाइकडे साहेबांची त्यांचे कार्यालयात भेट घेतली त्यावेळी त्यांनी मला "तुमच काय? असे विचारले त्यावेळी मी "साहेब माझी अधिंसख्य पदाची फाईल होती मंजुरीसाठी पाठवली होती थोडी लवकर मंजुरी मिळाली तर बर होईल साहेब" असे म्हणालो असता त्यांनी मला काय श्रेणीय असे विचारले त्यावर मी "शिक्षण सेवक अधिंसख्य फाईल पाठवली होती." असे म्हणालो. आमचे संभाषणावेळी सदर ठिकाणी खंदारे साहेब आले तेव्हा नाइकडे साहेब खंदारे साहेबांना "अधिंसख्य काय याच?" अशी विचारणा केली त्यावेळी खंदारे साहेब यांनी "फाइल पाठवली ना सर आपण सी ओ साहेबांकड" असे म्हणाले त्यावर मला नाईकडे साहेब "काय कारण याच ,सर्टीफिकेट नाय का?"असे विचारले. त्यावर मी "नाहीए सर" असे सांगितले असता नाइकडे सर खंदारे साहेबांना म्हणाले. "बडतर्फ करा जाऊदे घरी

यांना अधिसख्य पदावर काय सर्टीफिकेट नाय कामाच नोकरीला कस काय लागले तुम्ही" असे म्हणाले.त्यानंतर मी नाइकडे साहेबांच्या केबीनचे बाहेर येऊन थांबलो.त्यानंतर थोडया वेळाने खंदारे साहेब बाहेर आले व त्यांचे बरोबर मला त्यांचे केबीन मध्ये घेऊन गेले.त्यावेळी मी खंदारे साहेबांना "कस करायच साहेब मग सांगा" असे म्हणालो असता त्यावर त्यांनी "फक्त सी ओ साहेबांची सही राहीलीय बाकी काय तेव्हा" असे म्हणाले.सदर वेळी क्लार्क रणदीवे यांना खंदारे साहेब यांनी बोलावुन घेतले व मी नाइकडे साहेबांना भेटण्यास गेलो होते ा असे सांगितले त्यावेळी आमचेमध्ये माझ्या प्रस्तावाचे फाईल संदर्भात चर्चा झाली. त्यानंतर मी व पंच आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो.त्यानंतर तक्रारदार वाघाडे यांना पुढील कारवाईसाठी विचारणा केली असता आपणास संपर्क करेन त्यावेळी आपण पुढील कारवाई करु असे सांगितलेने कारवाई स्थगित करण्यात आली.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

दि.27/02/2026 रोजी तक्रारदार हे पुढील कारवाई कामी हजर झाले सदर वेळी त्यांनी पंचासमक्ष सांगितले की, अधिक्षक खंदारे व क्लार्क रणदीवे यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देणेसाठी घेऊन जातो असे सांगितलेने सापळापुर्व व सापळा पंचनामा कारवाई सुरू करण्यात आली.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार पवन वाघाडे यांना लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी त्यांचेकडील फक्त 75,000/- रुपये हजर केलेने सदर नोटांचे नंबर कागदावर लिहुन काढले त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या. उर्वरीत दोन लाख हे खेळण्यातील 500 रुपये लिहीलेल्या 400 नोटा लाच रकमेमध्ये समाविष्ट केल्या.

त्यानंतर अ ॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन सदर नोटांना अ ॅन्थ्रासीन पावडर लाऊन नोटा एका पांढ-या लिफाफयात ठेऊन सदर लिफाफयास अ ॅन्थ्रासीन बाहेरुन पावडर लाऊन एका पिशवीत ठेऊन ती पिशवी तक्रारदार यांचेकडे दिली त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने प्रथम तक्रारदार वाघाडे त्यानंतर दोन्ही पंचांचे निवेदन घेतले ती 11.38 वा ची वेळ होती.त्यानंतर योग्य त्या सुचना देऊन तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्ड चालु करुन लाऊन देऊन पंच मुठे यांचेसह रवाना केले ती वेळ 12.33 वा ची होती.त्या पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले. त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार हे पुर्व नियोजीत इशारा न करता पंच यांचेसह सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले ती वेळ 13.17 वा ची होती. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, ते पंच यांचेसह लाच रक्कम देणेसाठी जिल्हा परीषद पुणे येथे गेले असता सदर ठिकाणी खंदारे साहेब व क्लार्क रणदीवे दोघेही उपस्थित नसलेने ते लाच रक्कम न देता परत आले त्यानंतर तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा करता त्यांनी मी आपणास संपर्क करेन त्यावेळी पुढील कारवाई करु असे सांगितलेने त्या दिवशीख् ी कारवाई स्थगित केली.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

दि.04/03/2026 रोजी तक्रारदार हे सापळा कारवाई कामी हजर झालेने सापळा कारवाईचे अनुषंगाने प्रथम तक्रारदार वाघाडे त्यानंतर दोन्ही पंचांचे सापळा निवेदन घेतले ती 10.45 वा ची वेळ होती.सदर वेळी व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात आले.त्यानंतर योग्य त्या सुचना देऊन तक्रारदार यांचेकडे मागील कारवाई वेळी तक्रारदार यांनी आमचेकडे हजर केलेली अँन्थ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम देऊन त्यांना व्हॉईस रेकॉर्ड चालु करुन लाऊन देऊन पंच मुठे यांचेसह रवाना केली ती वेळ 11.19 वा ची होती.त्या पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले.त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार हे पुर्व नियोजीत इशारा न करता पंच यांचेसह सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले ती वेळ 11.59 वा ची होती. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की,मी व पंच मुठे असे जिल्हा परीषद पुणे येथे अधिक्षक खंदारे यांचे कार्यालयात गेले ा असता त्यावेळी अधिक्षक खंदारे यांनी मला "भेटली का ऑर्डर?" असे विचारले त्यावर मी नाही असे म्हणालो असता "ऑर्डर पाठवली कधीच आम्ही,पंचायत समितीला पाठवली लगीच सेवापुस्तकात नोंद करायला लावली. करुन घ्या म्हणल तुमच लगेच सगळ,एप्रिल चा पगार तुमचा झाला पाहीजे पुर्ण" त्या पंचायत समितीला जाऊन भेटा त्यांना.असे म्हणाले सदर वेळी रणदीवे क्लार्क तेथे आलेने अधिक्षक खंदारे यांनी क्लार्क रणदीवे यांना "बघा ती ऑडर पाठवायच" असे म्हणाले त्यावर रणदीवे क्लार्क हो असे बोलले. त्यानंतर तक्रारदार व पंच मुठे यांचेसहीत क्लार्क रणदीवे यांचे कार्यालयात गेले असता तक्रारदार यांना रंधवे यांनी "ई मेल केलय आधीच पाठवुन दिलय ओके,दोन कॉपी,तुम्हाला एक अन ऑ ॅफीसला एक" असे म्हणुन मला ऑर्डर च्या दोन कॉपी दिल्या. सदर वेळी त्यांनी तक्रारदार यांचेकडे लाच रकमेची मागणी न केलेने त्यांना लाच रक्कम न देता तक्रारदार हे पंच क्र.01 यांचे सहीत लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा न करता परत आले.त्यानंतर तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की,मी आपणास संपर्क करेल त्यावेळी पुढील कारवाई करु असे सांगितलेने त्या दिवशीची कारवाई स्थगित करण्यात आली.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

दि.06/04/2026 रोजी तक्रारदार हे सापळा कारवाई कामी हजर झालेने सापळा कारवाईचे अनुषंगाने

प्रथम तक्रारदार वाघाडे त्यानंतर दोन्ही पंचांचे सापळा निवेदन घेतले ती वेळ 12.56 वा ची होती.सदर वेळी व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात आले.त्यानंतर योग्य त्या सुचना देऊन तक्रारदार यांचेकडे मागील कारवाई वेळी तक्रारदार यांनी आमचेकडे हजर केलेली अॅन्थ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम देऊन त्यांना व्हॉईस रेकॉर्ड चालु करुन लाऊन देऊन पंच मुठे यांचेसह रवाना केले ती वेळ 13.13 वा ची होती.त्या पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले.त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार हे पुर्व नियोजीत इशारा न करता पंच यांचेसह सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले ती वेळ 14.18 वा ची होती. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की,मी व पंच मुठे असे जिल्हा परीषद पुणे येथे अधिक्षक खंदारे यांचे कार्यालयात गेले ा असता त्यावेळी अधिक्षक खंदारे हे त्यांचे कार्यालयात उपस्थित नव्हते.त्यानंतर मी पंच क्र.01 यांचेसहीत क्लार्क रणदीवे यांची भेट घेतली सदर वेळी क्लार्क रणदीवे यांनी मला "स्थायीत्व निघल का नाही? असे विचारले असता मी नाही निघल असे म्हणालो.त्यानंतर त्यांनी मला प्रस्ताव दिलेलाय का? असे विचारले त्यावर मी हां असे म्हणुन ते बिल वगैरे जमा झाले असे म्हणाले त्यावर त्यांनी सगळे पैसे असे विचारले असता मी हो म्हणालो त्यांवर रंधवे मला काय असच बोंबलत आले काय तुम्ही? पेढे-बिडे काय घेऊन-बिऊन आले का नाय"असे विचारले असता मी आणले असे म्हणाले ा. त्यावर ते नाईकडे साहेबांकड जायच, पेढे-बिढे घेऊन अन तिथ वर वाटा तुम्ही सर्वांना असे म्हणाले व त्यानंतर सहा साडे सहा वाजेपर्यंत थांबा असे म्हणाले त्यानंतर मी नाईकडे साहेबांची भेट घेण्यासाठी वरील मजल्यावरील त्यांचे कार्यालयात गेलो असता ते कार्यालयात उपस्थित नव्हते त्यांची भेट न झालेने मी खाली येऊन क्लार्क रणदीवे यांचे कार्यालयात गेलो असता क्लार्क रणदीवे तेथे उपस्थित नव्हते त्यानंतर मी लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा न करता पंच मुठे यांचे े सहीत परत आलो. अशी हकिकत सांगितली. .

त्या नंतर थोडया वेळाने तक्रारदार यांनी सांगितले की,त्यांचा मोबाईल क्र.9021638592 वर एका अनोळखी नंबर 8999564101 वरुन फोन आला होता व त्यांनी मला पेढे घेऊन विभागिय आयुक्त कार्यालय,पुणे येथे बोलावले आहे.त्यानंतर सदर मोबाईल नंबर वर कॉल करुन सदर कॉल शासकिय व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरले. सदर वेळी तक्रारदार यांचे मोबाईल वर 8999564101 या नंबर वरुन कॉल आला असता सदर कॉल तात्काळ शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन रेकॉर्ड केला ती वेळ 15.15 वा ची होती.सदर कॉल दरम्यान समोरील व्यक्तीने तक्रारदार यांना आले का नाहीत अजुन असे विचारले असता तक्रारदार यांनी सदर व्यक्तीस नाव विचारले असता त्यांनी नाव सांगितले नाही व फोन कट केला.

त्यानंतर तक्रारदार यांना पंच क्र.01 यांचेसहीत क्लार्क रणदीवे यांचेकडे सापळा कारवाई कामी जाणेबाबत सांगुन लाच रकमेसह व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन रवाना केले व त्यांचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.02 रवाना झाले ती वेळ 15.21 वा ची होती. तक्रारदार हे लाच रक्कम देणेकामी जिल्हा परीषद पुणे कार्यालयात गेले त्यानंतर काही वेळाने तक्रारदार पुर्व नियोजीत इशारा न करता पंच मुठे यांचेसह खाली आले व दुचाकीवरुन रवाना झाले त्यांचे पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले त्यानंतर विभागिय आयुक्त कार्यालयापासुन काही अंतरावर तक्रारदार व पंच क्र.01 हे दुचाकी वर थांबले व त्यावेळी तक्रारदार हे फोनवर बोलत असल्याचे दिसले त्यानंतर ते त्यांचे दुचाकी वरुन विधान भवनच्या मेन गेट मधुन आत गेले त्यांचे पाठोपाठ सापळा पथक जाऊन कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे थांबून राहीले थोडया वेळाने एका गाडीवरुन दोन इसम आलेचे दिसले व त्यांनी तक्रारदार यांना इशारा केल्याचे दिसले व त्यांचे पाठोपाठ तक्रारदार हे पंच मुठे यांचेसहीत दुचाकी वरुन विधान भवनच्या गेट मधुन बाहेर पडताना दिसले त्यानंतर घोरपडी गाव कडे जाणा-या रोडवर दोन इसमांनी त्यांची दुचाकी थांबवली व त्यांचे गाडी शेजारी तक्रारदार यांनी गाडी थांबवली.त्यांचेपासुन काही अंतरावर कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा पथक थांबुन राहीले काही वेळाने तक्रारदार यांनी डोक्यावरुन हात फिरवुन लाच रक्कम स्विकारलेचे पुर्व नियोजीत इशारा केला सदर ठिकाणी तात्काळ सापळा पथक पोहोचले त्यावेळी लाच रक्कम स्विकारलेले दुचाकी वरील दोन्ही इसम हे दुचाकी वरुन पळुन जाऊ लागले त्यावेळी आम्ही व पथकाने त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला परंतु सदर इसम हे भरधाव वेगाने त्यांचे ताब्यातील दुचाकी ने एम्प्रेस गार्डन कडे जाणा-या रोड ने पळुन जाऊ लागले त्यांचा पाठलाग आम्ही व पथकाने सुरु केला सदर इसमाने त्यांची गाडी डावी कडे वळवुन सोपान बाग रोड ने पुढे जाऊन बी टी कवडे रोड ला घेऊन 93 अॅव्हेन्यु मॉल च्या दिशेने पळुन जात असताना डीएसआर बिल्डींग फिडीलिटी डायग्नोस्टीक च्या समोर बि टी कवडे रोडवर सदर गाडी आम्ही पकडली असता पाठीमागे बसलेला इसम गाडीवरुन उतरुन पळुन गेला सदर वेळी सदर गाडी चालवत असलेल्या इसमास आम्ही तात्काळ ताब्यात घेऊन सोबत असणा-या शासकिय वाहनातील सापळा पथकातील अंमलदारांच्या ताब्यात देऊन पळुन गेलेल्या इसमाचा पाठलाग करुन शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले.सदर वेळी मपोहवा गोरे यांनी तक्रारदार पवन वाघाडे यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेऊन बंद केला ती वेळ 16.59 वा ची होती. सदर वेळी मपोहवा व्हिडीओ रेकॉर्डींग सुरु केले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.01 यांना लोकसेवक यांनी स्विकारलेली लाच रक्कम कुठे ठेवली आहे असे विचारले असता तक्रारदार यांनी अंगुली निर्देश करुन ताब्यात घेतलेले इसम हे अनिल रंधवे असल्याचे सांगुन त्यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारुन दुचाकी एम.एच 12 एक्स बी 4293 या गाडीच्या डिक्कीमध्ये ठेवले असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही लोकसेवक यांना त्यांचे नाव विचारता त्यांनी त्यांचे नाव अनिल पोपट रंधवे वय-32 वर्षे कनिष्ठ सहायक,शिक्षण विभाग,जिल्हा परीषद पुणे असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक रंधवे यांना विचारणा केली की, तक्रारदार वाघाडे यांचेकडून स्विकारलेल्या लाचेची रक्कम कोठे आहे? त्यावेळी लोकसेवक रंधवे यांनी सदरची लाच रक्कम दुचाकी एम.एच 12 एक्स बी 4293 या गाडीच्या डिक्कीमध्ये असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष लोकसेवक अनिल रंधवे यांचेकडील दुचाकी एम.एच 12 एक्स बी 4293 या गाडीच्या डिक्की उघडली असता त्यामध्ये लाच रक्कम असलेला पांढरा लिफाफा मिळुन आला त्यानंतर आम्ही दिलेल्या पुर्व सुचनेप्रमाणे पंच क्र.02 श्री.गोळपकर यांनी लाचेची रक्कम ताब्यात घेवून मोजली असता त्यामध्ये भारतीय चलनातील 500 रुपये किमतीच्या 150 नोटा म्हणजेच 75,000/- रुपये व उर्वरीत खेळण्यातील 500 रुपये लिहीलेल्या 400 नोटा असे एकुण दोन लाख पंच्याहत्तर हजार असल्याचे दिसून आले.त्यानंतर सदर नोटांचे सापळापुर्व कारवाई दरम्यान कागदावर लिहून ठेवलेल्या नोटांच्या नंबरशी खात्री केली असता तंतोतंत जुळून आले.त्यानंतर लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.अनिल पोपट रंधवे वय-32 वर्षे कनिष्ठ सहायक,शिक्षण विभाग,जिल्हा परीषद पुणे रा. एच 301,रॉयल रहाडगी,ग्रीन फेज शिवराज नगर काळेवाडी पिंपरी चिंचवड असे सांगितले.त्यानंतर आमचे सुचनेवरुन लोकसेवक अनिल रंधवे यांना शासकिय वाहनात घेऊन कृत्रीम अंधार करुन अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या सहाय्याने त्यांचे दोन्ही हाताची तपासणी केली असता अन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर पंच क्र.2 श्री.गोळपकर यांचे हातास अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली कारण त्यांनी सापळा यशस्वी झालेनंतर लाच रक्कम लोकसेवक यांचेकडून ताब्यात घेतली होती.ताब्यात घेतलेली लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर देखील फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली तसेच लाच रक्कम ठेवलेला पांढरा लिफाफयासही अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर देखील फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.तसेच गाडीची डिक्की तपासली असता तेथेही अँन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.

त्यानंतर सदर सापळा कारवाई वेळी ताब्यात घेण्यात आलेले गाडी चालवत असणारे इसम यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव आतिश केरु शिंदे वय-40 वर्षे व्यवसाय नोकरी पद-कनिष्ठ सहायक ,शिक्षण विभाग,जिल्हा परीषद,पुणे.रा.फलॅट नं.303 भैरवनाथ कॉम्प्लेक्स मोहंमदवाडी पुणे असे सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन लोकसेवक आतिष शिंदे यांची तपासणी केली असता कोठेही अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगांची चकाकी दिसून आली नाही.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.वाघाडे यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता त्यांनी घडलेल्या घटना क्रमानुसार वरीलप्रमाणे सविस्तर हकिकत सांगितली सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

तरी तक्रारदार पवन मारोती वाघाडे यांनी दि.06/01/2026 रोजी दिलेल्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने दि. 22/01/2026,दि.11/02/2026 दि.17/02/2026 दि.23/02/2026 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना शिक्षण सेवक पदावरुन उप शिक्षक पदावर घेताना जातवैधता प्रमाणपत्र नसले तरी अधिंसख्य पदावर वर्ग करुन घेतो व इतर सेवाविषयक व सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळवुन देता येतील अशी शिफारस करुन प्रस्ताव वर पाठवतो त्याकरीता अधिक्षक राजेश श्रीराम खंदारे व क्लार्क अनिल पोपट रंधवे यांनी स्वत:साठी तसेच वरीष्ठांना दयायचे आहेत असे सांगुन तक्रारदार यांचेकडे 3,00,000/- रु ची मागणी करुन त्यातील 25,000/- रुपये यापुर्वी स्विकारल्याचे मान्य करुन उर्वरीत 2,75,000/- रुपयाची लाचेची मागणी करुन दि.06/04/2026 रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान रंधवे यानी यापुर्वी मागणी केल्याप्रमाणे तक्रारदाराचे नमुद काम केल्याचा मोबदला म्हणुन तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम 2,75,000/- स्विकारली व सदर लाच रक्कम घेण्यास आतिष शिंदे यांनी सहाय करुन प्रोत्साहन दिले.सदर लाच रक्कम घेऊन ते दोघे पळुन जात असताना अनिल पोपट रंधवे वय-32 वर्षे कनिष्ठ सहायक,शिक्षण विभाग,जिल्हा परीषद पुणे व आतिष केरु शिंदे वय-40 वर्षे व्यवसाय नोकरी पद-कनिष्ठ सहायक ,शिक्षण विभाग,जिल्हा परीषद,पुणे यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे व त्यानंतर लोकसेवक राजेश श्रीराम खंदारे वय 52 वर्षे सहायक प्रशासन अधिकारी,शिक्षण विभाग ,जिल्हा परीषद पुणे यांना ताब्यात घेण्यात आले असुन यांचे विरुध्द वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर येथे भ्र.प्र.अधि.1988 कलम 7,12 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला....

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Bhausaheb Narayan Patil(I (Inspector)) / pi **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant. (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

P.F ACB

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अंमलदार
वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Bhausaheb Narayan

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** pi

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)